पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय.
साधु वासवानी चौक, जी.पी.ओ. शेजारी, पुणे - ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३२५, फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५
ई-मेल :- 1. crimecomp.pune@nic.in 2. cp.pune@nic.in

**पोलीस नोटीसद्वारे**

**: प्रे स नो ट :-**

**२०१८**

दिवाळी सणानिमित्त दरवर्षी तात्पुरते फटाके विक्री परवाने या कार्यालयाकडून देण्यात येतात. फटाके विक्री करतेवेळी व फटाके वाजवितेवेळी कोणताही धोका अथवा अपघात होऊ नये यासाठी कायद्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद असुन त्याप्रमाणे नागरीकांनी त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१. महाराष्ट्र शस्त्र अधिनियम (१५४) (३) अन्वये सरकारने कागदात स्फोटक पदार्थ ठेवलेले व त्याभोवती ४२.५३४ ग्रॅम वजनाचा ५.७१५ सेंटीमिटर लांबीचा व ३.१७५ सेंटीमिटर व्यासाचा दो-याने गुंडाळलेला ॲटमबॉम्ब म्हणून ओळखल्या जाणा-या फटाक्यांच्या उत्पादनावर जवळ बाळगणा-यावर आणि विक्रीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

२. फटाके परवाने दि. १०/१०/२०१८ पासून दि. १०/११/२०१८ पर्यन्त या कालावधीसाठीच देण्यात येणार आहेत. मुदत संपल्यानंतर फटाके अथवा शोभेची दारू यांची विक्री करता येणार नाही. तसेच शिल्लक राहिलेले फटाके अथवा साठा हा परवाना असलेल्या गोदामामध्ये किंवा घाऊक परवाना धारण करणा-याकडे परत करणे आवश्यक आहे.

३. पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्रामध्ये कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यांपासून १० मीटर अंतराचे आत मुंबई पोलीस अधिनियम १९५१ पोट कलम ३३ ' यु ' मधील तरतुदी नुसार कोणत्याही प्रकारची शोभेची दारू अगर कोणत्याही नावाने ओळखले जाणारे फटाके फेकणे, सोडणे, उडविणे, अगर फायर बलून किंवा अग्निबाण उडविणे ही कृत्ये करण्यास मनाई आहे. सदर कलम २ चे पोट कलम १५ अन्वये रस्त्यांत कोणत्याही महामार्ग/पूल/सेतू मार्गावर नेमलेले मार्ग, सेतू कमानीवजा घाट, धक्का किंवा कोणतीही आळी किंवा वाट मग ती रहदारीची असो अथवा नसो याचा समावेश होतो. या आदेशाचे उल्लंघन जी व्यक्ती करेल ती वरील कायदयान्वये (कलम १३१ (ए) सह (i)) कायदेशीर कारवाईस पात्र ठरेल.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ७२/१९९८ मध्ये दिनांक २७.९.२००१ रोजी सुनावणीच्या दरम्यान दसरा, दिवाळी, व इतर सणांच्या वेळी मोठया आवाजाचे फटाके उडविल्यामुळे निर्माण होणारे ध्वनी व हवा प्रदुषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी असे फटाके वाजविण्यावर निर्बंध घालणे बाबत अंतरिम आदेश दिलेले आहेत. त्या नुसार व सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनी प्रदुषणाबाबतचे निर्देश दि.१८/०७/०५ नुसार.

अ. केंद्र शासन, केंद्र शासित प्रदेश आणि राज्य शासन यांनी भारत सरकारच्या राजपत्र क्रमांक जीएसआर/६८२-ई दिनांक ५.१०.९९ नुसार प्रकाशित केलेल्या पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ अंतर्गत पर्यावरण (संरक्षण) नियमातील तरतूदीची मुख्यत्वे करून या नियमातील सुधारित नियम ८९ ची ज्या फटाक्यांच्या आवाजांच्या मानंका बाबत आहेत त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. त्यानुसार,

१. एखादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरावर १२५ डेसीबल आवाज निर्माण करणा-या फटाक्यांचे उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे.

२. जर साखळी फटाका ५० ते १०० तसेच १०० व त्यावरील फटाके असतील तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरापर्यंत अनुक्रमें ११५/११० व १०५ डेसीबल एवढी असावी. यापेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या तसेच १०० पेक्षा जास्त फटाके असलेल्या सर्व साखळी फटाका उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यात येत आहे.

ब.) ध्वनी निर्माण करुन आवाजाचे प्रदुषण करणा-या फटाक्यांवर रात्री १०.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत संपूर्ण बंदी घालण्यांत येत आहे. परंतु जे फटाके विविध रंग निर्माण करतात किंवा सोडतात किंवा आवाज करित नाहीत अश्या फटाक्यांवर निर्बंध घालण्याची आवश्यकता नाही.

क.) शांतता प्रभागात कोणत्याही फटाक्याचा वापर कुठल्याही वेळेत करण्यात येऊ नये. शांतता प्रभागामध्ये रूग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये यांच्या सभोवतालचे १०० मीटर पर्यंतचे क्षेत्र येते.

५. पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा संघटन, नागपूर यांचेकडील परिपत्रक क्र.आर-४(२) १८३/सी.सी.१९४/२०१५, दि.१५/१२/२०१५ अन्वये **परवानाधारक यांनी विदेशी मूळ फटाके विक्री करू नये** अशा सूचना दिलेल्या आहेत.

६. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ कलम ३३ मधील अधिकारान्वये खालील फटाके विक्रीचे ठिकाणी ५० मिटरचे परिसरात वाहने पार्किंगसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत.

१. म्हात्रे पुल २. हडपसर ३. गोळीबार मैदान
४ खडकी बाजार ५. विश्रांतवाडी

७. ज्या ठिकाणी तात्पुरत्या फटाका स्टॉलकरिता परवानगी देण्यात आली आहे त्या ठिकाणी ५० मिटरच्या परिसरात संयुक्त नियंत्रक, विस्फोटके, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक जीएसआर – ६८७ (इ) दि. २७-९-१९८४ मधील परि. क्र. ५ अन्वये फटाक्यांची आतिषबाजी करण्यावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत.

तरी, वरील नियमाचे काटेकोरपणे पालन करून कोणताही अपघात अथवा धोका होणार नाही याबाबत कृपया नागरिकांनी दक्षता घ्यावी.

पुणे
दिनांक १० /०९/२०१८

के. वेंकटेशम्

( डॉ के. व्यंकटेशम् )
पोलीस आयुक्त, पुणे शहर.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय.
साधु वासवानी चौक, जी.पी.ओ. शेजारी, पुणे - ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३२५, फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५
ई-मेल :- 1. crimecomp.pune@nic.in 2. cp.pune@nic.in

## दिवाळी सणानिमित्त फटाका विक्री व साठा करण्यासाठी तात्पुरते परवाना घेणे बाबत जाहीर सुचना-२०१८

पुणे शहर आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दिवाळी सणा निमित्त शोभेची दारू व फटाके विक्रीचे परवाने देणेबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबली जाणार आहे.

१. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम ३३ अन्वये पुणे, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड, लष्कर, खडकी, यांचेतर्फे केले जाणा-या लिलावात भाग घेणा-यांनी प्रथम पोलीस आयुक्त कार्यालयातील व्हेरिफिकेशन ब्रँच मधून ना हरकत दाखला घ्यावा व त्याकरिता रू.१/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावून अर्ज करावा त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. लिलावात जागा घेतल्या नंतर शोभेची दारू विक्री करिता स्वतंत्र अर्ज खालील प्रमाणे करण्यात यावा.

अ. लिलावात घेतलेल्या जागेचा तपशिल कागदपत्रांसह दयावा.

ब. अर्जास रू.१/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावावा.

क. परवाना शुल्क रू. ६००/- ही संबंधीत पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयात रोख भरण्यात यावी.

३. वरील भागाशिवाय पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील इतर ठिकाणी शोभेची दारू विक्रीचे परवाने देणेसाठी खालील प्रमाणे पद्धत अवलंबण्यात येईल.

अ. परवाने मंजूरीचे काम (१) पोलीस उप आयुक्त परिमंडळ - १. (फरासखाना इमारत) २. पोलीस उप आयुक्त परिमंडळ - २ (लष्कर पोलीस स्टेशन इमारत) ३. पोलीस उप आयुक्त परिमंडळ - ३ ( एरंडवणा पो चौकीजवळ ) ४. पोलीस उप आयुक्त परिमंडळ - ४ (नगर रोड, येरवडा पोलीस स्टेशन जवळ) आणि ५. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-५ (विशेष शाखा-२ पो आयुक्त कार्यालय पुणे येथे ) या कार्यालयांकडून होणार आहे. संबंधीतांनी अर्ज त्या कार्यालयाकडे सादर करावेत.

ब. अर्जदाराने रू. १/- चा कोर्ट फी स्टॅम्पसह जागेचे तपशिलवार माहितीसह संबंधीत पोलीस उप आयुक्त यांना परवाना मिळण्यासाठी अर्ज करावा. जागा विटाची, सिमेंट कॉंक्रीट बांधकामाची असावी.

क. अर्जदाराने पोलीस आयुक्त कार्यालयात चारित्र्य पडताळणी करिता व्हेरिफिकेशन ब्रँच येथे अर्ज करुन त्याची पोच (छायांकित प्रत) परवाना मंजूरीसाठी सादर केलेल्या अर्जासोबत जोडावी.

ड. अर्जा सोबत जागेचे लोकेशन, मोजमाप, आजुबाजुचा परिसर व रस्ते दर्शविणारा कच्चा नकाशा, जागा योग्य असले बाबतचा नगरपालिका अथवा ग्रामपंचायतीचा दाखला जोडावा. अग्नीशामक अधिकारी यांचेकडील ना हरकत दाखला, महानगरपालिका, आकाशचिन्ह विभागाकडील ना-हरकत दाखला, जागा मालकीची असल्यास मालकी संबंधी अथवा भाडयाची असल्यास जागा मालकाचे संमतीपत्र या बाबतची कागदपत्रे जोडावीत.

इ. गतवर्षी सध्याचे नियोजित जागी परवाना घेतला असल्यास त्याचा तपशिल व परवान्याची छायांकित प्रत जोडावी.

फ. अर्जासोबत सादर केलेल्या छायांकित प्रती नोटराईज/साक्षांकित करुन सादर कराव्यात.

४. अर्ज स्विकारण्याची मुदत दि ०८/१०/२०१८ ते दि.०३/११/२०१८ पर्यंत असून अर्ज सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत संबंधीत परिमंडळ पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

५. दिनांक ०३/११/२०१८ नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा त्याचा विचार केला जाणार नाही.

६. परवाना दि. १०/१०/२०१८ ते दि.१०/११/२०१८ पर्यन्त या कालावधीसाठीच दिला जाईल.

७. मंजूर परवाने संबंधीत पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातून सायं ४ ते ६ वाजे पर्यंत वाटप केले जांतील.

८. परवाना शुल्क रूपये ६००/- ही संबंधित पोलीस उप आयुक्त कार्यालयांकडे रोख स्वरुपात भरण्यात यावी.

९. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, ध्वनीप्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २००२ तसेच वरील संदर्भात सर्वोच्च किंवा इतर न्यायालयाकडून निर्गमित झालेल्या सूचना (विशेषतः दिनांक १८-७-२००५ चे सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनी प्रदूषणा बाबतचे निर्देश याचे पालन करावे.

१०. संयुक्त नियंत्रक , विस्फोटके, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक इ - २ (ए) इएक्सपीएल, जीईएन , दि.२-९-२००५ व त्यासोबतची अधिसूचना क्रमांक जीएसआर-६८७(ई), दिनांक २७-९-१९८४ मधील सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

११. पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा संघटन, नागपूर यांचेकडील परिपत्रक क्र.आर-४(२) १८३/सी.सी.१९४/२०१५, दि.१५/१२/२०१५ अन्वये **परवानाधारक यांनी विदेशी मूळ फटाके विक्री करू नये** अशा सूचना दिलेल्या आहेत.

१२. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून धोकादायक ठिकाणी परवाने देणेत येणार नाहीत. अर्जासोबत वर नमूद प्रमाणे आवश्यक माहिती दाखले व इतर कागदपत्रे जोडलेली नसतील अथवा अर्ज अपूर्ण असेल, तसेच मुदती नंतर अर्ज प्राप्त झालेस अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

पुणे

दिनांक १० /०९/२०१८

( डॉ के. व्यंकटेशम् )
पोलीस आयुक्त, पुणे शहर.